ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख ११ सप्टेंबर, १९५५ | अंक ३८

## विविध माहिती

**मालवाहू डब्यांचा कारखाना**—रेल्वेच्या वहातुकीला लागणारे मालाचे डबे तयार करण्याचा कारखाना ग्वाल्हेर येथें लवकरच काढण्यांत येणार असल्याचें समजतें. कारखाना काढण्याच्या कामीं भारतामधील एका प्रमुख उद्योगपतीनें पुढाकार घेतला आहे. नवीन कारखान्याला भारतीय सरकारच्या रेल्वेखात्याची संमति मिळेल अशी अपेक्षा आहे.

**बडोदा विद्यापीठाला देणगी**—अमेरिकेंतील रॉकफेलर फौंडेशननें बडोदा विद्यापीठाच्या समाजशास्त्रीय शाखेला ३३,२२० रुपयांची देणगी दिली आहे. सौराष्ट्रामधील महुवा ह्या गांवीं घडून आलेल्या सामाजिक परिवर्तनांचा अभ्यास करण्यासाठीं वरील रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

**काड्याच्या पेट्यांचे कारखाने**—१९५५-५६ सालांत हैदराबाद राज्यांत काड्याच्या पेट्या तयार करण्याचे १८ कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यापैकीं तीन कारखाने ' ब ' वर्गाचे असतील व त्यांच्यासाठीं प्रत्येकीं ३,१२,००० रुपये लागतील. १५ कारखाने ' ड ' वर्गाचे असतील. ह्या वर्गातील प्रत्येक कारखान्यासाठीं ६,००० रुपये भांडवल गुंतवावें लागेल.

**व्हेनिसमध्यें ' शिवनृत्य '**—व्हेनिसमध्यें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत व्ही. शांताराम ह्यांनीं दिग्दर्शित केलेला ' शिवनृत्य ' हा चित्रपट दाखविण्यांत आला. चित्रपट रंगीत असून भारतातर्फे उत्सवांत भाग घेतलेला तो एकच चित्रपट होता. चित्रपटांतील भारतीय नृत्यांचीं दृश्यें प्रेक्षकांना फारच आवडलीं.

**पाकिस्तानांत इंडस्ट्रिअल बँकेची स्थापना**—पाकिस्तानांत परदेशी भांडवलाच्या मदतीनें एक इंडस्ट्रिअल बँक स्थापन करण्यांत येणार आहे. जागतिक बँकेचे तज्ज्ञ त्याबाबत चर्चा करण्यासाठीं पाकिस्तानांत जाणार आहेत.

**बागलकोट सिमेंट कंपनी**—वरील कंपनीचा सिमेंटचा कारखाना गेल्या आठवड्यांत सुरू झाला. कारखान्याची उत्पादनक्षमता दरसाल १ लक्ष टन एवढी आहे. सध्यां रोज १५० टन सिमेंट तयार होईल व लवकरच तें ३३० टनांपर्यंत वाढेल.

**सौराष्ट्रांत नवी गिरणी**—सौराष्ट्रांतील लिंबडी ह्या गांवीं सूत कातण्याची गिरणी काढण्यांत येणार आहे. गिरणीसाठीं लागणाऱ्या भांडवलापैकीं १५ लाख रुपये राज्यसरकार देणार आहे. आणि सहकारी संस्था व लोक मिळून बाकीचे ३५ लाख रुपयांचें भांडवल गोळा करणार आहेत. अशीच आणखी एक गिरणी सोरठ जिल्ह्यांत काढण्यांत येणार आहे. सध्यां सौराष्ट्रांत सुताच्या ११ गिरण्या आहेत.

**रशिआच्या सहकार्यानें चित्रपट**—भारतांतील एक फिल्मनिर्माते श्री. के. अब्बास हे मॉस्कोला गेले आहेत. भारतीय जीवनावर रशिआच्या सहकार्यानें काढण्यांत यावयाच्या बोलपटाची पटकथा निश्चित करण्यासाठीं ते तेथें गेले आहेत. भारतीय अनुबोधपटांचे निर्माते श्री. गार्ग हेहि ह्याच कामासाठीं रशिआला गेले आहेत.

**बँक नोकरांची मागणी फेटाळली**—गजेंद्रगडकर बँक अवार्डमध्यें हैदराबाद व कानपूर येथील बँक नोकरांबाबत करण्यांत आलेल्या शिफारसी अधिक फायदेशीर कराव्या अशी मागणी तेथील कारकुनांच्या संघामार्फत करण्यांत आली होती. भारतीय सरकारनें ही मागणी फेटाळून लावली आहे.

**बुद्धाच्या जयंतीनिमित्त तिकिटें**— गौतमबुद्धाची २,५०० वी जन्मतिथि भारतांत साजरी करण्यांत येणार आहे. ह्या निमित्तानें नेपाळच्या सरकारनें पोस्टाचीं नवीन तिकिटें काढण्याचें ठरविलें आहे. भारतीय सरकारहि ह्या स्मृति दिनानिमित्त मोठी रक्कम खर्च करणार आहे.

**कामगारांना बोनस**—अहमदाबादमधील ६५ गिरण्यांपैकीं ४ गिरण्यांच्या ५,००० मजुरांना १५ दिवसांचें वेतन बोनस म्हणून मिळणार आहे. बोनस १९५३ सालाबद्दलचें आहे. ह्या गिरण्यांना तोटा झालेला असतांहि मजुरांशीं झालेल्या कराराप्रमाणें त्या बोनस वाटीत आहेत. इतर गिरण्याहि दिवाळीपूर्वी बोनसची वांटणी करणार आहेत.

**शब्दकोड्यांवरील नियंत्रणाचा कायदा**—वृत्तपत्रांतील शब्दकोड्यांवर नियंत्रणें घालणाऱ्या कायद्याचें बिल भारतीय सरकारनें तयार केलें आहे. १,००० रुपयांपेक्षा अधिक बक्षिसें देणाऱ्या शब्दकोड्यांना कायद्याप्रमाणें बंदी करण्यांत आली आहे. शब्दकोड्यांशीं सादृश्य असणाऱ्या इतर स्पर्धांनाहि बंदी करण्यांत आली आहे.

**आपद्ग्रस्तांना मदत**—भारतामधील नद्यांना आलेल्या पुरानें ज्यांचें नुकसान झालें आहे अशा आपद्ग्रस्त लोकांना मदत करण्यासाठीं अमेरिकेनें भारताला १ लाख डॉलर्सचा गहूं देण्याचें ठरविलें आहे. अमेरिकेजवळ शिल्लक असलेल्या साठ्यांतून ही मदत करण्यांत येत आहे. गहूं अमेरिकन बोटींतूनच भारतांत आणला जाईल.

**साखरेच्या कारखान्यासाठीं भांडवल**— कोपरगांव तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं राहता भाग सहकारी साखर कारखान्यासाठीं १,५०,००० रुपयांचें भाग भांडवल एका दिवसांत जमविलें. ह्या कारखान्यासाठीं लागणारा परवाना मध्यवर्ती सरकारकडून ह्यापूर्वींच मिळाला आहे. मुंबई राज्यांत निघणाऱ्या नव्या साखर कारखान्यांपैकीं हा एक आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

श्री. संपादक, " अर्थ " यांस—

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांतील कलम ५४ च्या दुरुस्तीच्या आवश्यकतेसंबंधीं दिनांक १० ऑगस्ट १९५५ च्या अंकांत " एक सहकारी " व दिनांक २४ ऑगस्ट १९५५ च्या अंकांत " दत्तशर्मा " यांचे लेख प्रसिद्ध झाले होते. " दत्तशर्मा " यांच्या लेखांत न्यायदान मंडळाच्या (ट्रायब्युनलच्या) ज्या निर्णयासंबंधीं उल्लेख आला आहे तो संपूर्ण निर्णय (मराठींत) " सहकारी जगत् " या मासिकाच्या ऑगस्ट १९५५ चे अंकांत प्रसिद्ध झाला आहे.

वरील तीनहि लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी मीं ही बाब सहकारी खात्याचे रजिस्ट्रारसाहेब व मुंबई सरकारचे सहकार–मंत्रि यांचे नजरेस आणली होती व कलम ५४ मध्यें शक्य तितक्या लवकर दुरुस्ती करण्याबद्दल सूचनाहि केली होती व जरूर तर मी या बावत सहकार–मंत्रि यांचेवरोवर चर्चा करण्यास तयार आहे असेंहि त्यांना कळविलें होतें. विशेषतः लवाद बोर्ड नेमण्याबद्दल जी तजवीज कलम ५४ मध्यें आहे, तेवढी तरी तावडतोव रद्द करावी व मग या विषयाचा सांगोपांग विचार होऊन सदर कायद्यांत आणखीहि कांहीं दुरुस्त्या करण्यांत याव्यात असेंहि मीं त्या अधिकाऱ्यांना सुचविलें होतें. त्यावर मे. रजिस्ट्रारसाहेब यांचें मला जा. नं. अे. डी. एम्.–१८४/५४ दिनांक ३१ ऑगस्ट १९५५ चें उत्तर आलें, त्यांत " लवाद·मंडळ नेमण्याबावतची तरतूद रद्द करण्याचा विचार चालू आहे " वगैरे मजकूर आहे. त्यानंतर मे. असिस्टंट सेक्रेटरी टु दि गव्हर्मेंट यांचें मला जा. नं. C. S. R. 1155/80409-D दिनांक १३ सप्टेंबर १९५५ चे पुढीलप्रमाणें पत्र आलें आहे :—

" With reference to your letter dated the 2nd August 1955, I am directed to state that the question of dispensing with the provisions in the Act regarding arbitration is under the consideration of Government. It is, therefore, not necessary for you to discuss the matter with the Minister for Co-operation. "

आपल्या वाचकांपैकीं ज्यांना या विषयासंबंधीं आणखी कांहीं सूचना करावयाच्या असतील, त्या त्यांनीं मुंबई सरकारकडे सत्वर केल्यास त्यांचाहि यावेळीं विचार होण्याची मला शक्यता वाटते. सबब त्यांनीं तसें तावडतोव करावें, अशी त्यांना माझी आग्रहपूर्वक विनंती आहे.

आपला

द. दि. चितळे

---

**पंचवार्षिक योजनेला बाहेरची मदत**—भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला परदेशीय मदत मिळविण्याच्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. बेनेगल रामराव जागतिक बँकेशीं बोलणीं करीत आहेत. जागतिक बँकेची परिषद इस्तंबूल येथें भरली असतांना, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळें भारताच्या विकासाची गति दुप्पट होईल अशी माहिती त्यांनीं बँकेला सादर केली.

**ग्वाल्हेर ते उज्जैन रेल्वे रस्ता**—ग्वाल्हेर व उज्जैन ह्या शहरांना जोडणाऱ्या रुंद रुळाच्या रस्त्याची प्राथमिक पहाणी करण्याच्या कामाला रेल्वे–बोर्डाकडून मंजुरी मिळाली आहे. हा रस्ता झाल्यावर मध्यभारताच्या मध्य विभागांतील व्यापार, शेती व उद्योगधंदे ह्यांना चांगलें उत्तेजन मिळेल. उज्जैन–इंदूर रेल्वे-रस्ता झाल्यावर ग्वाल्हेर हें इंदूर शहरालाहि सरळ जोडलें जाईल.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
कॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य





बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेले
किर्लोस्कर
बैलांनी व पॉवरवर चालणारे
उसाचे चरक
आपल्या पसंतीनुरूप आणि गरजेप्रमाणे योग्य चरकाची निवड करा.
• शरद
• कोयना
• वसंत
सविस्तर माहिती आजच मागवा.



किर्लोस्कर बंधु लि.
किर्लोस्करवाडी द. सातारा.

# अर्थ

बुधवार, ता. २१ सप्टेंबर, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रिझर्व्ह बँकेची सहकारी बँकांना मदत

बँकिंगच्या सोई लहान गांवें व ग्रामीण विभाग ह्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँक गेलीं कांहीं वर्षें करीत आहे. १९५० सालीं रूरल बँकिंग चौकशी कमिटीनें कांहीं शिफारसी केल्या त्याबाबत प्रगति सत्वर घडवून आणावयाची असेल, तर अनेक मार्गांनीं एकदम प्रयत्न केले पाहिजेत, हें लवकरच स्पष्ट झालें. त्याचें मार्गदर्शन करण्यासाठी रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीची नेमणूक झाली. तिचा अहवाल २० डिसेंबर, १९५४ रोजीं प्रसिद्ध झाला. सरकारची वेगवेगळ्या पातळींवर भागीदारी, शेतमालाची विक्री, इत्यादींचा कर्जपुरवठा व इतर आर्थिक व्यवहारांशीं संबंध जोडणें व ग्रामीण जनतेच्या गरजा लक्षांत घेऊन काम करणाऱ्या लायक नोकरवर्गाचे द्वारां कारभार, अशीं तीन महत्त्वाचीं तत्त्वें कमिटीनें घालून दिलीं. स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्याचा सरकारचा निर्णय, हें हीं तत्त्वें अंमलांत आणण्याच्या कार्यक्रमांतील पहिलें पाऊल होतें. पांच मोठाले राष्ट्रीय फंड निर्माण करण्याचीहि कमिटीनें सूचना केली. त्या सर्वांचा फायदा दिसूं लागण्यास अर्थातच वेळ लागेल. तूर्त, १९५४–५५ मध्यें रिझर्व्ह बँकेनें सहकारी बँकांना कसें व किती साहाय्य केलें, हें पाहाणें उद्‌बोधक होईल.

### सहकारी बँकांची ऐच्छिक तपासणी

वेगवेगळ्या राज्यांतील सहकारी संघटनेची पुनर्रचना करण्याचे बाबतींत बरीच प्रगति दिसून आली. १९५४–५५ अखेर सर्व अ वर्ग राज्यें, सर्व ब वर्ग राज्यें आणि मणिपूर, त्रिपुरा व कच्छ वगळून बाकी सर्व क वर्ग राज्यें ह्यांतून केंद्रीय सहकारी बँकांची स्थापना झालेली आहे. १९५२–५३ सालापासूनच सहकारी बँकांची ऐच्छिक तपासणी चालू आहे. त्या वर्षी दोन, १९५३–५४ मध्यें १४ व १९५४–५५ मध्यें ३५ सहकारी बँका तपासण्यांत आल्या. प्रत्येक बँकेच्या कारभारांत आढळलेले दोष व त्यांतील सुधारणाबाबत सूचना सहकारी खात्यांच्या रजिस्ट्रारांकडे पाठविण्यांत आल्या.

### कर्जांच्या मंजूर केलेल्या मर्यादांत वाढ

मोसमी शेतकी कर्जें व मालाची विक्री ह्यांचेसाठी राज्य सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेनें मंजूर केलेल्या कर्जांची मर्यादा गेल्या वर्षी बरीच वाढविण्यांत आली; त्या कर्जांवर फक्त १½% दरानें व्याज आकारण्यांत येतें. १९५३–५४ मध्यें १३ राज्य सहकारी बँकांना १६३·२ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं होतीं; १९५४–५५ मध्यें १५ बँकांना २१·२१ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं. कित्येक राज्यांतून सहकारी चळवळीची पुनर्घटना करण्यांत आली आणि ज्या बँकांना त्यांच्या स्वतःच्या पतीवर कर्ज देणें शक्य नव्हतें, अशा बँकांना राज्य सरकारें जामीन राहिलीं, म्हणून कर्जांत बरीच मोठी वाढ होऊं शकली.

### मध्यम मुदतीचीं कर्जें

१९५३ मध्यें रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली, तिचे अन्वयें रिझर्व्ह बँक १५ महिने ते ५ वर्षें ह्या मुदतीचीं कर्जें देऊं शकते. ह्या दुरुस्तीप्रमाणें, रिझर्व्ह बँक आतां ३ वर्षें मुदतीचीं कर्जें देते; अगदीं जरूरीच्या कारणांसाठी ५ वर्षें मुदतीच्या कर्जाच्या अर्जाचाहि विचार होऊं शकतो. बँक रेटच्या खालीं २% असा व्याजाचा दर ठरलेला आहे. ह्या कर्जांस त्या त्या राज्य सरकारांची जामिनकी व कर्ज घेणाऱ्या मध्यवर्ती सहकारी बँका किंवा सोसायट्या ह्यांच्या प्रॉमिसरी नोटा, हें तारण असतें. आंध्र, मद्रास, हैद्राबाद व पंजाब अशा चार राज्यांतील केंद्रीय सहकारी बँकांना १·२२ कोटी रुपयांचीं मध्यम मुदतीचीं कर्जें देण्यांत आलीं.

### लँड मॉर्गेज बँकांचीं डिबेंचर्स

लँड मॉर्गेज बँकांना उत्पादक कार्यांसाठी अधिकाधिक कर्जें देतां यावींत, ह्याकरितां त्या बँकांचीं डिबेंचर्स रिझर्व्ह बँक व सरकार ह्यांनीं जोडीनें विकत घ्यावीं, अशी योजना आहे. अहवालाचे वर्षी चार राज्यांतील (आंध्र, मद्रास, म्हैसूर, त्रावणकोर–कोचीन) मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकांचीं डिबेंचर्स योग्य अटींवर खरीदण्याची तयारी रिझर्व्ह बँकेनें दाखविली होती. त्यांपैकीं, मद्रास व आंध्र येथील डिबेंचर्स परस्पर विकलीं गेलीं व बाकीच्या दोन सरकारांनीं डिबेंचर्सच्या बाबतींत रिझर्व्ह बँकेची आणखी पुढें मदत मागितली नाहीं.

### सहकारी विक्री

कर्जें व मालविक्री ह्यांची सांगड घालणें, ही रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीची एक महत्त्वाची शिफारस आहे. त्यासाठी प्राथमिक, प्रादेशिक, राज्य, अशा थरांसाठी मार्केटिंग सोसायट्यांची आवश्यकता आहे. कांहीं विद्यमान मार्केटिंग फेडरेशन्सची पाहाणी करून, प्राथमिक सोसायट्यांच्या विस्ताराची आखणी करावी, असें ठरलें. त्याबाबत अहवालाचे वर्षअखेर प्रारंभ करण्यांत आला.

---

**शेती–संस्थेला कर्ज**—कोल्हापूर ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटीला मुंबई सरकारनें ५ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्जाचा विनियोग मंडई बांधण्यासाठी करावयाचा आहे. कोल्हापूर विभागांतील समाज–विकास योजनेंत समाविष्ट असलेल्या ग्रामीण भागांत छोट्या धंद्यांची व ग्रामोद्योगांची वाढ करण्यासाठीहि इतकेंच कर्ज देण्यांत आलें आहे.

**मालवाहू डबे जोडण्याचा कारखाना**—सौराष्ट्रांतील भावनगर ह्या शहरांत रेल्वेचे मालवाहू डबे जुळविण्याचा कारखाना काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. प्रवासी डब्यांची व वाघिणींची दुरुस्ती करणारे तीन कारखाने सौराष्ट्रांत आहेतच. मुंबईंतील एक कंपनी नव्या कारखान्याबाबत पुढाकार घेत आहे.

## मुंबई राज्यांत कागदाची नवी गिरणी

मुंबई राज्यांतील नॉर्थकॅनरा जिल्ह्यांत दांडेली ह्या गांवीं कागदाचा नवा कारखाना काढण्यांत येणार आहे. हें गांव कागदाच्या कारखान्याला विशेष अनुकूल असें आहे. कारखान्यांत अगदीं आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार असून रोजचें उत्पादन सुमारें ६० टन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ १९५७ च्या शेवटच्या तिमाहींत होईल असें दिसतें. दांडेली येथें काढण्यांत येणाऱ्या कारखान्याइतका मोठा कारखाना मुंबई राज्यांत नसल्यानें राज्यांतील कागदाची बाजारपेठ त्याला आपोआपच उपलब्ध होणार आहे. कागदाच्या उत्पादनाची किंमतहि इतर कागदाच्या गिरण्यांच्या मानानें बरीच कमी राहील. कागद व लगदा तयार करण्याचें अद्यावत् तंत्र वापरण्यांत येणार असल्यामुळें कच्चा माल, रसायनें आणि मजुरी ह्या सर्वच बाबतींत बचत होणार आहे. इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ह्या संस्थेनें कारखान्याचे सर्व शेअर्स खपविण्याचें अंगावर घेतलें आहे असें समजतें. हें खरें असेल, तर सार्वजनिक रीत्या विक्रीस काढलेलें भांडवल सरकारी इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशननें खपविण्याचें तें पहिलेंच उदाहरण ठरेल. कारखान्याची व्यवस्था पहाण्यासाठी मॅनेजिंग एजंटस् नेमण्यांत येणार नाहींत, असें समजतें. गिरणी उभारण्याच्या कामीं बंगूर–सोमाणी गटानें पुढाकार घेतलेला असून ६० लाख रुपयांचें भांडवल घेतलें आहे असें म्हणतात. भारतांत सध्यां कागदाचा धंदा फारसा विस्तारलेला नाहीं. त्यामुळें नव्या कागदाच्या गिरण्यांना पुष्कळच वाव आहे. कागदाच्या किंमतीहि उत्तेजनक अशाच आहेत.

## नारळाच्या लागवडीसंबंधीं परिषद

गेल्या महिन्यांत फिलिपाइन्समधील मॅनिला ह्या शहरीं नारळाची लागवड करणाऱ्या देशांची पहिली आंतरराष्ट्रीय परिषद् भरली होती. इंडिअन सेंट्रल कोकोनट कमिटीचे चिटणीस श्री. के. गोपालन् परिषदेला हजर राहिले होते. ह्या धंद्यासंबंधीं परिषदेंत झालेल्या कामकाजाची माहिती सांगतांना ते म्हणाले कीं, ज्या देशांत नारळीच्या झाडांची लागवड करण्यांत येते त्या देशांनीं एकमेकांकडे तज्ज्ञ पाठवावे असा निर्णय घेण्यांत आला आहे. संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या ज्या विविध शाखा आहेत, त्यांच्यापैकीं एखाद्या शाखेकडे नारळाच्या जागतिक बाजारपेठांची पहाणी-तपासणी करण्याचें कार्य सोंपविण्यांत यावे अशी विनंतीहि करण्यांत आली. नारळाच्या लागवडीसंबंधीं संबधित राष्ट्रांनीं मिळून एखादी संशोधन–संस्था काढण्याच्या शक्यतेचाहि संयुक्त राष्ट्र–संघटनेकडून विचार करण्यांत यावा. नारळाच्या धंद्यांत गुंतलेल्या लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठी एकदिलानें प्रयत्न करणें आतां शक्य झालें आहे. ह्या परिषदेच्या निमित्तानें नारळाच्या धंद्यांतील आशिआ खंडांतील देश एकत्र आले आणि धंद्याचा उत्कर्ष साधण्यासाठी एकजुटीनें काम करणें किती महत्त्वाचें आहे तें त्यांना पटलें. खोबरें आणि खोबरेल तेल ह्यांचा सर्वांना मान्य असा दर्जा ठरविण्यासाठी श्री. गोपालन् ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. नारळ व त्यापासून तयार केलेल्या वस्तूंची वहातूक करणाऱ्या कंपन्यांनीं वेगवेगळे दर ठेवूं नयेत आणि आगाऊ कळविल्याशिवाय दरांत बदल करूं नयेत, असाहि प्रयत्न कमिटी करणार आहे.

## चित्तरंजन कारखान्याचें उत्पादन

चित्तरंजन येथील रेल्वे–एंजिनें तयार करण्याचा कारखाना १९५० सालीं सुरू करण्यांत आला. तेव्हांपासून कारखान्यांतून २७५ रेल्वे एंजिनें बाहेर पडलीं आहेत. उत्पादनाच्या गतींतहि सुधारणा होत आहे. गेल्या दोन महिन्यांत तर दरमहा ११ एंजिनें तयार करण्यांत आलीं. ह्या बाबतींतील हा नवा उच्चांक आहे. गेल्या दोन महिन्यांत प्रत्येकी ९ बॉयलर्स तयार करण्यांत आले. १२० रेल्वे एंजिनें तयार करण्याचें जें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें, तें ठरलेल्या काळाच्या आधींच गांठण्यात आलें. १९५४ च्या आरंभींच्या महिन्यांत दरमहिना ६ एंजिनें तयार होत असत, तीं १९५४ अखेरपर्यंत ८ होऊं लागलीं. १९५५ च्या आरंभाला ही संख्या दहापर्यंत आली. एंजिनांच्या उत्पादनाच्या खर्चातहि घट झालेली आहे. प्रारंभीं दर एंजिनामागें ७·५ लाख रुपये खर्च येत असे. आतां तो ५ लाख रुपये इतकाच येतो. कारखान्यांत तयार होणाऱ्या पद्धतीचें परदेशी एंजिन आयात केलें तर त्यासाठी ५·३५ लाख रुपये द्यावे लागतात. एक एंजिन तयार करण्यासाठी ५,३३५ सुटे भाग लागतात. त्यापैकीं फक्त ९० च आतां परदेशांतून आयात करावे लागतात. ७६९ भाग देशांतील निरनिराळ्या ठिकाणांहून मागविले जातात आणि उरलेले ४,४७६ भाग कारखान्यांतच तयार केले जातात. कोलंबो मदत–योजनेप्रमाणें सुमारें १०–१२ परकीय तज्ज्ञ कारखान्यांत काम करीत आहेत. आधुनिक पद्धतीची कांहीं यंत्रसामुग्री कशी चालते, तें दाखविण्यासाठी ह्या तज्ज्ञांची सध्यां जरूर आहे.

दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.
शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) — श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे — श्री. श्री. गो. मराठे
श्री. मा. रा. जोशी — श्री. फ. दो. पद्मजी
श्री. मा. वी. शहा — श्री. मा. म. गुप्ते

शाखा :
अहमदनगर, अमरावती, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर (म्हैसूर सं.), हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, कल्याण, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर, श्रीरामपूर, ठाणें व किर्लोस्करवाडी

मुख्य कचेरीः– थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.
चिं. वि. जोग, मॅनेजर.

# 'यंत्रबहाद्दुर' शंभोराव जांभेकर

## व्यक्ति आणि कार्य

### श्री. लक्ष्मणरावांचे कर्तबगार सहकारी

श्री. महादेव बाळकृष्ण ऊर्फ शंभोराव जांभेकर ह्यांच्या वयास नुकतींच ७० वर्षें पुरीं झालीं. त्यानिमित्त, त्यांचें व्यक्तित्व व कार्य ह्यांची माहिती करून देणारें एक छोटेसें सचित्र पुस्तक म्हैसूर किर्लोस्कर लि. ( हरिहर ) नें प्रकाशित केलें आहे. श्री. जांभेकर ह्यांची औद्योगिक क्षेत्रांतील कामगिरी फार मोठी आहे. श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या कर्तबगारीची सर इतरांना येणें शक्य नाहीं; पण त्यांच्या निवडक सहकाऱ्यांत श्री. शंभोराव ह्यांना अत्यंत वरचें स्थान आहे. त्याचें प्रत्यंतर म्हणजे, किर्लोस्कर बंधू लि. च्या मॅनेजिंग एजन्सी कंपनींत श्री. शंभोरावांचें नांव पार्टनर म्हणून श्री. लक्ष्मणरावांनंतर दुसरें होतें. श्री. शंभोरावांनीं आपल्या कर्तबगारीनें श्री. लक्ष्मणरावांच्या विश्वासाचें चीज करून दाखविलें आहे.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाच्या इतिहासांत श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचें नांव सुवर्णाक्षरांनीं लिहावें लागेल, यांत शंकाच नाहीं. कारण, श्री. लक्ष्मणरावांच्या उपक्रमापूर्वीं महाराष्ट्राला कारखानदारीची परंपरा नव्हती. प्रतिकूल परिस्थितींत व अत्यंत मर्यादित साधनांवर प्रारंभ करून अल्पावधींत आपल्या छोट्या उद्योगाचें एका मोठ्या कारखान्यांत त्यांनीं रूपांतर केलें व त्यायोगें औद्योगिक महाराष्ट्राचा पायाच घातला. ४५ वर्षांपूर्वीं कुंडल रोडच्या माळावर, सापांच्या आणि निवडुंगाच्या सान्निध्यांत, केवळ मूठभर लोकांच्या मदतीवर श्री. लक्ष्मणरावांनीं जो कारखाना सुरू केला त्या ठिकाणीं आज एक अद्यावत् वसाहत उभी आहे आणि महाराष्ट्रांतला सर्वांत मोठा कारखाना सुव्यवस्थित चालू आहे; इतकेंच नव्हे, तर पुणें, हरिहर व बंगलोर या तीन ठिकाणीं गेल्या १५ वर्षांत तीन नवे कारखाने निघाले आहेत.

श्री. लक्ष्मणरावांच्या लोकोत्तर कर्तबगारीच्या रोपाला खतपाणी घालून चांगल्या रीतीनें वाढविण्याच्या कामीं औंध संस्थानचे राजेसाहेब श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, तसेच लक्ष्मणरावांचे दोघे थोरले बंधु श्री. रामुअण्णा किर्लोस्कर व डॉ. वा. का. किर्लोस्कर वगैरेंचें मोठें साहाय्य झालें. त्याचबरोबर, कारखान्यांतील उत्पादन वेळेवर व समाधानकारक रीतीनें करण्याच्या कामीं व व्यावसायिक आणि आर्थिक दृष्ट्या कारखाना स्थिर पायावर उभा राहण्याच्या कामीं ज्या कांहीं निवडक सहकाऱ्यांची फार मोठी मदत झाली, त्यांमध्यें रावबहादुर एम्. बी. ऊर्फ शंभोराव जांभेकर यांचें स्थान फार वरचें आहे.

आज आपला देश प्रगतिपथावर असून ही प्रगति सर्वांगीण आणि सर्वांना हितकारी होण्यासाठी पंचवार्षिक योजना आखल्या जात आहेत. औद्योगिक क्षेत्रांत तर आपल्या देशाला खूपच मजल गाठायची आहे. त्यासाठीं या क्षेत्रांत ज्यांनीं दीर्घकाल तपस्या करून आपली कर्तबगारी दाखवली आहे त्यांचें कार्य आणि विचार यांचा परिचय असणें अगत्याचें वाटतें. श्री. शंभोरावांचा श्री. बा. कृ. गलगली ह्यांनीं करून दिलेला हा परिचय या दृष्टीनें विशेष महत्त्वाचा वाटतो.

शंभोराव हे श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या थोरल्या भगिनी बटुअक्का यांचे धाकटे चिरंजीव. बटुअक्का मुंबईस असतांना श्री. लक्ष्मणराव हे व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट मध्यें ड्रॉइंग शिक्षक म्हणून काम करीत होते आणि बटुअक्कांच्याकडेच राहात होते.

शंभोरावांचा जन्म ठाणें येथें २६ ऑगस्ट, १८८५ रोजीं झाला. त्यांचें मराठी चार यत्तांपर्यंतचें शिक्षण ठाणें येथेंच झालें. पुढें इंग्रजी चार यत्तांपर्यंत मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कुलांत ते होते. दापोलीलाहि ते शिक्षणासाठीं दोन वर्षें होतें. शेवटीं हैद्राबाद हायस्कुलांतून ते मद्रास युनिव्हर्सिटीचे मॅट्रिक झाले.

मॅट्रिक होण्याच्या अगोदर कांहीं दिवस १९०३ सालीं शंभोरावांचा विवाह बेळगांव येथें रियासतकार सरदेसाई यांची भाची गोदूताई कानेटकर यांच्याशीं झाला. गोदूताई "गंगावहिनी" या नांवानें सर्वांना परिचित आहेत.

लग्नानंतर कांहीं दिवस शंभोरावांनीं तार ऑफिसांत नोकरी धरली होती. पण पुढें ती सोडून भायखळ्याच्या टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्यें ( आतांची व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूट ) प्रवेश केला; आणि तेथील अभ्यासक्रम यशस्वीरीतीनें संपवून ते इंजिनियर म्हणून बाहेर पडले.

पुढें सोलापुरास डॉ. वा. का. किर्लोस्कर यांनीं स्थापन केलेल्या शिवाजी मेटल वर्क्समध्यें शंभोराव काम करूं लागले.

पुढें १९११ सालीं शंभोराव टिकेकरवाडीहून किर्लोस्करवाडीच्या कारखान्यांत कामाला आले व तेथें त्यांचा दर्जा हळूहळू चढत गेला.

### किर्लोस्करवाडीमधील कामगिरी

१९२० सालीं किर्लोस्कर कारखान्याचें 'किर्लोस्कर बंधु लिमिटेड' मध्यें रूपांतर होऊन 'किर्लोस्कर सन्स अँड कंपनी'कडे त्यांची मॅनेजिंग एजन्सी आली. या मॅनेजिंग एजंटांच्या यादींत पार्टनर म्हणून श्रीयुत लक्ष्मणराव किर्लोस्करांनंतर शंभोरावांचें नांव दुसरें होतें.

शंभोरावांना आधुनिक युगांतील अश्वांची म्हणजे यंत्रांची परीक्षा आहे असें म्हटल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. कमींत कमी अश्वशक्तीच्या चिमुकल्या यंत्रापासून तों शेंकडों अश्वशक्तीच्या प्रचंड यांत्रिक घुडापर्यंत प्रत्येक यंत्रांची नस ते अचूक ओळखतात. म्हणूनच, किर्लोस्कर कारखान्यांतर्फे यंत्रसामुग्री आणण्यासाठी परदेशांत जाण्याची पहिली संधि अण्णांना मिळाली. १९२२ सालीं जर्मनी व इतर युरोपियन देशांनंतर ते अमेरिकेलाहि जाऊन आले.

शंभोरावांनीं युरोपांतून पाठवलेल्या सुमारें १ लक्ष रुपये किंमतीच्या यंत्रांची स्थापना १९२४ सालाच्या मध्यांत किर्लोस्कर कारखान्यांत झाली.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं आपल्या देशांतील कारखान्यांनीं फारच महत्त्वाची कामगिरी बजावली. किर्लोस्कर कारखान्यानें उत्तर आफ्रिका व इतर रणक्षेत्रांत उपयुक्त होतील असे, वजनाला हलके पण कामाला भक्कम अशा प्रकारचे नीरा पंप पुरवले; व ते वेळेवर आणि लागतील तितके पुरवले आणि त्यांनीं मनपसंत कामें दिलें. किर्लोस्कर कारखान्याचे वर्क्स सुपरिंटेंडेंट श्री. शंभोराव यांच्या नेतृत्वाखालींच या पंपांच्या उत्पादनाचें काम झालें.

### मशीन टूल्सचे यशस्वी उत्पादक

१९४१ सालीं हरिहर येथील म्हैसूर किर्लोस्कर लि. या कारखान्याची सुरुवात म्हणजे किर्लोस्कर बंधूंच्या एका नव्या उपक्रमाचा, तसेंच श्री. जांभेकर यांच्या जीवनांतील नव्या कालखंडाचा प्रारंभ होय.

म्हैसूर संस्थानांत मशीनटूल्सचा स्वतंत्र कारखाना उभा करून तो यशस्वी रीतीनें चालविण्याची महत्त्वाची कामगिरी किर्लोस्कर कारखान्याच्या चालकांनीं जांभेकरांच्यावर सोंपविली. शंभोरावांची कार्यपद्धति, विविध क्षेत्रांतील माणसांच्या ओळखी, यांत्रिक आणि औद्योगिक विषयांचें ज्ञान आणि अनुभव हीं लक्षांत घेतां आपल्या अंगीकृत कार्यांत ते यशस्वी होतील अशी चालकांची अपेक्षा—नव्हे, खात्री होतीच. आणि गेल्या बारा वर्षांतली हरिहरच्या कारखान्याची प्रगति पाहतां शंभोरावांनीं नुसतें समाधानकारकच नव्हे, तर ज्याला डोळ्यांत भरण्याजोगें घवघवीत यश म्हणतां येईल, तें संपादन करून दाखवलें आहे असाच प्रत्यय येईल.

हा कारखाना चालू करण्यापूर्वीं त्याच्या प्रत्येक लहानसहान बाबीचीदेखील रूपरेखा अगदीं बारीकसारीक तपशिलांसह शंभोरावांनीं आंखली होती. म्हणूनच किर्लोस्करवाडीहून माणसें कामाला येण्याअगोदर कारखान्याच्या इमारती पूर्णपणें तयार झाल्या होत्या, यंत्रें बसवण्यांत आलीं होतीं आणि कामाची व्यवस्थाहि ठरवून टाकण्यांत आली होती. सारी योजना पक्की होती म्हणूनच कार्य आखल्याप्रमाणें सुरू झालें.

१९४२ सालीं कारखान्याला एका महत्त्वाच्या विभागाची जोड देण्यांत आली. तो विभाग म्हणजे फाऊंडरी होय.

किर्लोस्करवाडीच्या कारखान्यांतून सरकारला युद्धक्षेत्रावर लागणारे नीरा पंप पुरविण्याची कामगिरी यापूर्वींच शंभोरावांनीं बजावली होती. मशीन टूल्सची मदतहि सरकारला या कारखान्यामार्फत चांगल्या प्रकारें झाली. याबद्दल १९४५ सालीं शंभोरावांना हिंदुस्थान सरकारनें 'रावबहादुर' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. किर्लोस्करवाडींतील कामगारांनीं आणि नागरिकांनीं या पदवीप्राप्तीबद्दल रा. ब. जांभेकर यांचा समाजमंदिरांत सत्कार केला. त्याप्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले : "मला 'रावबहादुर' या पदवीपेक्षां 'यंत्रबहादुर' अशी पदवी दिली असती तर अधिक आनंद झाला असता !"

१९४६ सालीं युद्ध समाप्त झालें. मशीन टूल कंट्रोलरचें अस्तित्व उरलें नाहीं आणि कारखान्याला आपल्या पसंतीप्रमाणें उत्पादन करतां येऊं लागलें. कारखान्याच्या स्थापनेपासून आतांपर्यंत ठराविक स्वरूपाचींच मशीन टूल्स तयार होत असत. यानंतर नव्या प्रकारचीं मशीनटूल्स तयार करण्याचा उपक्रम कारखान्यानें केला.

आणि शंभोरावांना हवी होती तशी संधि पण १९४७ सालीं मिळाली. पश्चिम जर्मनींत दोस्तराष्ट्रांच्या हातीं लागलेली मशीनरी खरेदी करण्याच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें एक शिष्टमंडळ पाठवलें, त्यांत शंभोरावांचा सभासद या नात्यानें समावेश झाला. त्याप्रमाणें ते जर्मनीस गेले.

१९४७ पर्यंत देशांत मशीन टूल्स तयार करणारे कांहीं कारखाने निघाले. या सर्व मशीन टूल्स कारखानदारांची "इंडियन मशीन टूल्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन" ही संस्था स्थापन करण्याच्या कामीं शंभोरावांनीं बराच पुढाकार घेतला. ही संस्था १९४९ सालीं स्थापन झाली. सर धनजीशहा कूपर हे प्रारंभीं ३ वर्षें अध्यक्ष होते. १९५२ पासून शंभोराव त्या असोसिएशनचे अध्यक्ष आहेत.

हिंदुस्थानांतील मशीन टूल्सच्या व्यवसायाला आवश्यक तें संरक्षण मिळालें पाहिजे आणि परदेशांतून होणारी मशीन टूल्सची आयात थांबवली पाहिजे, याबद्दलचें साधार आणि सविस्तर निवेदन शंभोरावांनीं १९४८ सालीं टॅरिफ बोर्ड कमिशनरला सादर केलें आहे. हें निवेदन इतकें प्रभावी आहे, कीं देशाचें औद्योगीकरण झपाट्यानें व्हावें असें वाटणाऱ्या प्रत्येक विचारवंत माणसाला त्यांतील प्रत्येक वाक्य न् वाक्य महत्त्वाचें वाटेल.

## विक्री क्षेत्रांतील कामगिरी

त्यानंतर कंट्रोल्स बंद होऊन बाजार खुला झाला खरा, पण आर्थिक मंदीची लाट देशांत जी उसळली; ती हरिहरच्या कारखान्याला येऊन धडकली ! मालाला मागण्या येईनात. तोंपर्यंत कारखान्याची उत्पादनक्षमता समाधानकारक रीतीनें वाढली होती. एका महिन्यांत १२० हरिहर लेथ्स तयार करण्याचा विक्रम श्री. राजारामबापूंनीं सहज रीतीनें करून दाखवला होता; इतकेंच नव्हे, तर १९४९ सालीं या कारखान्यानें देशांत अद्याप ज्याचें उत्पादन झालें नव्हतें अशा प्रकारचा गिअर्ड-हेड लेथ तयार करून तो दिल्ली येथील प्रदर्शनांत मांडलाहि होता. प्रश्न होता हो ग्राहकांचा.

शंभोरावांनी रेल्वे बोर्डाकडे मोर्चा वळवला. भारतीय रेल्वेच्या कारखान्याला अनेक मशीन टूल्स लागत असतात व हीं मशीन टूल्स बहुतेक सर्व परदेशांतून मागवीत असत. परदेशी आयात बंद करून रेल्वे बोर्डानें देशांत उत्पादन होणारीं मशीन टूल्स घ्यावीं असा योग्य आग्रह शंभोरावांनीं त्या बोर्डाकडे धरला. आपलें म्हणणें पटवून देण्यासाठी त्यांना पांचसहा वेळां दिल्लीला जावें लागलें आणि रेल्वे बोर्डाच्या निरनिराळ्या सभासदांना देशी मशीन टूल्सची उपयुक्तता व महत्त्व दाखवून द्यावें लागलें. शेवटीं सहा महिने आमचीं मशीन टूल्स वापरून पाहा आणि तीं समाधानकारक काम देतील तरच घ्या, या बोलीवर १५ लेथ मशीन्स शंभोरावांनीं रेल्वे बोर्डाला देऊं केलीं.

या मशीन टूल्सनी रेल्वे बोर्डाचें समाधान झालें. आणि तेव्हांपासून रेल्वेच्या कारखान्यांतून हरिहरच्या मशीन टूल्सना मागण्या येऊं लागल्या. सरकारच्या इतर खात्यांकडूनहि ( सार्वजनिक बांधकाम वगैरे ) मागण्या हळूहळू येऊं लागल्या. सरकारनें हरिहरचीं मशीन टूल्स घेतलीं; एवढेंच नव्हे, तर परदेशाहून होणारी लेथ्सची आयात बंद केली, हें यश इतकें घवघवीत आहे, कीं त्याचें वर्णन करण्यासाठीं निराळ्या शब्दांची जरूरीच नाहीं.

गेल्या मार्च महिन्यांत जांभेकर जपानच्या औद्योगिक सफरीवर निघाले आणि जून महिन्यांत परत आले. त्यांच्यासोबत सौ. गंगावहिनीहि गेल्या होत्या. ते जपानला गेले तेव्हां आपल्या कारखान्याचें नांव जपानच्या औद्योगिक क्षेत्रांत सर्वांच्या परिचयाचें झालें असल्याचें त्यांना आढळून आलें.

अत्यंत अल्प कालावधींत हरिहरच्या कारखान्याला भारताच्या औद्योगिक नकाशांत महत्त्वाचें स्थान प्राप्त करून देण्याचें मोठें श्रेय शंभोरावांना दिलें पाहिजे.

गेल्या सालीं १०० लेथ्सची मागणी ब्रह्मदेशाहून आली. दोन वर्षांपूर्वीं कैरो येथील औद्योगिक प्रदर्शनांत हरिहर कारखान्यांत तयार झालेली यंत्रसामुग्री मांडण्यां [illegible] होती.

अगदीं अलीकडेच हरिहर कारखान्याचे सव्वा लाख रुपये किंमतीचे शेअर्स न्यू इंडिया विमा कंपनीनें विकत घेतले आहेत. उद्योगधंदे आणि विमा कंपन्या यांच्या परस्पर सहकार्यानें प्रगतिपथावरचा हा नवा टप्पा हरिहर कारखान्यानें गांठला आहे.

शंभोरावांच्या औद्योगिक क्षेत्रांतील कामगिरीचें कितीहि

तपशीलवार वर्णन केलें तरी केवळ त्यावरून त्यांच्या व्यक्तित्वाची संपूर्ण कल्पना कधींच येणार नाहीं. कारण, शंभोरावांच्या व्यक्तित्वाला इतरहि अनेक चमकदार पैलू आहेत. एखाद्या कुशल नटाप्रमाणें कारखानदाराच्या भूमिकेइतक्याच कौटुंबिक अगर सामाजिक जीवनांतील इतर भूमिकाहि ते मोठ्या कौशल्यानें वठवीत असतात.

श्री. शंभोराव हे आतां हरिहर कारखान्याच्या दैनंदिन जबाबदारींतून निवृत्त झाले आहेत. त्यामुळें त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा अधिक विस्तृत औद्योगिक क्षेत्रास मिळणार आहे. त्यांना व त्यांच्या अनुरूप सहधर्मचारिणी, सौ. गंगाबाई जांभेकर, ह्यांना आम्हीं सुदीर्घ आयुरारोग्य चिंतितों.

## रिझर्व्ह बँकेचा वार्षिक अहवाल
## ( १९५४–५५ )

सरकारी क्षेत्रांत जलद गतीनें करण्यांत आलेला वाढत्या प्रमाणावरील खर्च, हीं १९५४–५५ मधील आर्थिक विकासांतील उल्लेखनीय बाब होय. पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीच्या वर्षांत कामाच्या प्रगतीचा वेग मंद होता व त्यामुळें मागें पडलेले कार्यक्रम पार पाडण्यासाठी वाढत्या प्रमाणांत सद्दूं वर्षी खर्च करावा लागला आणि म्हणूनच अर्थसंकल्पित तुटींत अधिक वाढ होण्यांत या गोष्टींची परिणति झाली.

उत्पादनांत उल्लेखनीय वाढ झाल्यामुळें सरकारी योजनांवरील खर्चांत बरीच वाढ झाल्यामुळें आणि त्यांच्याच जोडीला योग्य तीं जकातविषक धोरणें अवलंबिल्यामुळें १९५४-५५ मध्यें बळकटी प्राप्त झाली. शेतीसाठी तसेंच उद्योगधंद्यांसाठी पैसा पुरविण्याकरितां असलेल्या संस्थात्मक यंत्रणेचा विकास करण्यांत आला व तसेंच अनेक प्रकारें ही यंत्रणा भक्कम करण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आंखणीचा विचार करतां बचतींत झालेली सुधारणा आणि देण्याघेण्याच्या परिस्थितींतील बदल याहि विशेष महत्त्वाच्या घटना आहेत.

तथापि देशाच्या एकूण आर्थिक परिस्थितीचा विचार करतां अन्नधान्यांच्या किंमतींत झालेली कमालीची घट आणि शहरी कामगारांमधील बेकारी या दोन्ही गोष्टी कांहींशी चिंता निर्माण करणाऱ्या होत्या. त्यापैकीं घसरत्या भावांना आतां आळा बसला आहे.

बँकिंगच्या सोयी अधिक ठिकाणीं उपलब्ध करणें आणि १९४९ च्या बँकिंग कंपनीज अॅक्टाच्या विविध तरतुदींची अंमलबजावणी करून एकंदर बँक पद्धतीस बळकटी आणणें या रिझर्व्ह बँकेच्या कामकाजांतील कांहीं महत्त्वाच्या बाबी होत.

बँकिंगच्या क्षेत्रांतील १९५४–५५ मधील अर्थव्यवहार व विकास यासंबंधांत अहवालांत पुढील निष्कर्ष काढण्यांत आले आहेत.

( १ ) दुसऱ्या योजनेच्या काळांत विकासाचा वेग आणखी वाढविण्याच्या दृष्टीनें निश्चितपणें चांगली स्थिति आहे.

( २ ) पूर्वी कधीं नव्हते इतक्या प्रमाणांत आदल्या वर्षी अन्नधान्याचें उत्पादन झालें होतें, तें कायम राखण्यांत आलें आणि औद्योगिक उत्पादनांतहि समाधानकारक वाढ झाली. या १९५४–५५ मधील भारताच्या अर्थव्यवस्थेतील उत्तेजनकारक गोष्टी आहेत.

( ३ ) मालाच्या किंमतींत घट : मालाच्या किंमतींत अहवालाच्या वर्षांत १० टक्क्यांनीं घट झाली. ( गतवर्षी ती ६ टक्क्यांनीं झाली होती. ) अन्नधान्यांच्या बाबतींत ही घट अधिक प्रमाणांत म्हणजे १८ टक्क्यांनीं झाली. भावाच्या पातळींत झालेली ही घट पूर्वीच्या महागाईवर उतारा असून अधिक झपाट्यानें आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कामीं पायाभूत म्हणून उपयोगी पडणारी आहे.

( ४ ) नाणें पुरवठ्याचा विस्तार : मध्यवर्ती सरकारच्या अर्थसंकल्पित तुटींत वाढ आणि बँक कर्जाचा विस्तार या गोष्टी १९५४–५५ मध्यें नाणेंपुरवठा वाढण्यास कारणीभूत झाल्या. या परिस्थितीवर देण्याघेण्याच्या परिस्थितीचाहि बराच परिणाम झाला व तो भांडवली बाजूंत दिसून येतो. तथापि नाणें पुरवठ्यांत वाढ ( सुमारें १८३ कोटी रु. ) होऊनहि त्याचबरोबर उत्पादनांतहि वाढ झाल्यामुळें चलनवाढीचें संकट निर्माण झालें नाहीं.

( ५ ) बँक पद्धतीवर या वर्षांत पडलेला ताण बऱ्याच प्रमाणांत बँकांनीं आपल्याच साधनांतून तसेंच, उलाढालींच्या प्रमुख महिन्यांत रिझर्व्ह बँकेकडून २०७ कोटी रु. इतकी उचल करून भागविला. त्यापैकीं ९८ कोटी रु. बिल मार्केट स्कीम अन्वयें दिलेले होते. मागील हंगामांत असे फक्त ८० कोटी रु. देण्यांत आलेले होते.

( ६ ) ग्रामीण पत व्यवस्था : या वर्षांतील प्रमुख घटना म्हणजे अ. भा. ग्रामीण पत पाहणीच्या मार्गदर्शन समितीच्या सर्वसामान्य अहवालाचे डिसेंबर १९५४ मध्यें झालेलें प्रकाशन हीं होय. ग्रामीण भागांत सांठवणीच्या आणि गुदामविषयक सोयींच्या बरोबरच कर्ज पुरवठा करण्यासाठी सहकारी यंत्रणांत जोम निर्माण करावा आणि त्या विभागांतील बँकिंगच्या सोयींत वाढ करण्यांत यावी असें ह्या समितीनें आपल्या शिफारशींत म्हटलें आहे.

### परदेशी देणें घेणें

या अहवालांत, १९५३ च्या अखेरीस परदेशांशीं असलेल्या दीर्घ मुदतींच्या भारताच्या देण्याघेण्याच्या व्यवहाराच्या सदर बँकेनें केलेल्या पाहणीचा उल्लेख आहे. त्यावरून पाहतां दीर्घ मुदतींच्या देण्यांची रक्कम १,०३८ कोटी रु. व येणें असलेली रक्कम १,१७५ कोटी रु. आहे. भारतांत परदेशीयांनीं व्यापारांत गुंतविलेली एकूण रक्कम पुस्तकी किंमतींत पाहतां ४२१ कोटी रु. असून, त्यापैकीं ८० टक्क्यांवर रक्कम परस्पर गुंतविलेल्यापैकीं आहे. यापैकीं बरीचशी ( सुमारें २५० कोटी रु. ) गुंतवणूक इंग्लंडमधील लोकांनीं केलेली आहे. परस्पर भांडवल गुंतविलेल्यांमध्यें अमेरिकन खासगी भांडवलाचें प्रमाण अधिक ( ३१ कोटी रु. ) आहे. १९४८ ते १९५३ या मुदतींत १३० कोटी रु. परदेशीय खाजगी भांडवल भारतांत गुंतविण्यांत आलें. त्यापैकीं ४० टके रक्कम एतद्देशीय शाखांच्या व्यवहारांत झालेल्या नफ्यांची परत गुंतविण्यांत आलेली रक्कम आणि परकीय कंपन्यांच्या शाखांच्या वांटणी न केलेल्या नफ्याची रक्कम मिळून झालेली आहे.

---

**नवीन रेल्वे रस्त्याची पहाणी**—कन्याकुमारीपासून तिनेवेल्ली आणि त्रिवेंद्रमपर्यंत जाणाऱ्या नव्या रेल्वे-रस्त्याची प्राथमिक पहाणी दक्षिण रेल्वेतर्फे करण्यांत येणार आहे. रस्त्याची लांबी सुमारें १०५ मैल होईल. ह्या पहाणीसाठी रेल्वे बोर्डानें ५४,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

### कॉसमॉस बँकेची निवडणूक

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें या बँकेची वार्षिक निवडणूक दि. ११ सप्टेंबर, १९५५ रोजीं होऊन खालीलप्रमाणें पदाधिकारी १९५५–५६ सालाकरितां निवडून आले आहेत.

१. सल्लागार मंडळ:—१ श्री. शं. ल. ओगले, २ श्री. चिं. वा. भट, ३ श्री. पां. रा. देव, ४ श्री. ग. न. जेजुरीकर, ५ श्री. गो. शं. देशमुख.

२. कार्यकारी मंडळ:—१ डॉ. न. का. घारपुरे, २ श्री. ग. या. नातू, ३ श्री. वा. रा. होनप, ४ श्री. वि. ल. हर्डीकर, ५ श्री. य. बा. देहाडराय, ६ श्री. स. वा. कुलकर्णी, ७ श्री. द. स. पारखी, ८ श्री. मो. पां. देशपांडे, ९ श्री. स. का. गोखले, १० श्री. रा. द. भट, ११ वा. म. लेले.

३. स्थानिक आयव्यय निरीक्षकः—१ श्री. रा. कृ. देशपांडे, २ श्री. व. का. साठे.

सल्लागार मंडळाचे अध्यक्ष श्री. ग. न. जेजुरीकर, उपाध्यक्ष-श्री. चिं. वा. भट व कार्यकारी मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. स. वा. कुलकर्णी, उपकार्याध्यक्ष श्री. वा. रा. होनप, असे निवडून आले आहेत.

---

### पोलादाच्या उत्पादनांत वाढ

पोलादाच्या चालू कारखान्यांचे मान्य झालेले विकास-कार्यक्रम पुरे झाल्यावर आणि नवे सरकारी पोलाद कारखाने उभारले गेल्यावर लोखंड व पोलादाचें संभाव्य उत्पादन पुढीलप्रमाणें होईल.

| | प्रतिवर्षीचें विक्रीयोग्य पोलाद |
|---|---|
| १. टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लि. | १५,००,००० |
| २. इंडियन आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लि. | ८,००,००० |
| ३. म्हैसूर आयर्न ॲण्ड स्टील वर्क्स | १,००,००० |
| ४. रूरकेला येथील पोलाद कारखाना | ७,२०,००० |
| ५. भिलाई येथील पोलाद कारखाना | ७,५०,००० |
| ६. ब्रिटिश पोलाद कारखाना | ७,५०,००० |

### खादी हुंड्या पोस्टांत विकत मिळणार

खादीच्या विक्रीस प्रोत्साहन मिळावें ह्या हेतूनें अ. भा. खादी बोर्डातर्फे भारतांतील सुमारें ४९,००० पोस्ट ऑफिसांतून खादी हुंड्या विकण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. ८ सप्टेंबर रोजीं विक्रीस प्रारंभ होऊन ती ३१ मार्च, १९५५ अखेर चालू राहील. हुंडी ज्या महिन्यांत खरीदली, त्याच्यानंतर सहा महिनेपर्यंत ती केव्हांहि उपयोगांत आणतां येईल. त्या हुंडीच्या मोबदल्यांत बोर्डाची मान्यता असलेल्या कोणत्याहि डेपोंत खादी घेतां येईल.

---

**जमिनीची धूप थांबविणार**—सौराष्ट्र सरकारनें जमिनीची धूप थांबविण्यासाठी मोठा कार्यक्रम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. हें काम करण्यासाठी शेंकडों ओव्हरसिअर्सना शिक्षण देऊन तयार करण्यांत येणार आहे. अशा प्रकारचें एक शिक्षण–केंद्र मोरवी येथें उघडण्यांतहि आलें आहे. त्याचप्रमाणें, जरूर ती यंत्रसामुग्रीहि नमविण्यांत येत आहे.


स्थापना सन १९३५ टे. नं. २४५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ८०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. द. अ. ढोबळे, बी. ए., एम्. एल. ए., जे. पी., ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. उ. भा. तांबे, श्री. आ. पां. ढोरे,
श्री. म. भा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



## सांगली बँक लि.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक
मुंबई शाखा — फोर्ट

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | ४½ लक्ष रु. |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | ५¾ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | सव्वा कोटीवर |

— व्याजाचे दर —

| | द. सा. द. शें. |
|---|---|
| करंट ... ... | रु. ०–८–० |
| सेव्हिंग ... ... | रु. १–८–० |
| स्पे. सेव्हिंग ... | रु. २–०–० |
| १ वर्ष मुदत ... | रु. ३–०–० |
| २ वर्षे मुदत ... | रु. ३–४–० |
| ३ वर्षे मुदत ... | रु. ३–८–० |
| ४ वर्षे मुदत ... | रु. ३–१२–० |
| ५ वर्षे मुदत ... | रु. ४–०–० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.
बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२७ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.